साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शंकर बाबाराव रोकडे
वय:–३२ वर्ष, व्यवसाय–दुकाण
राह.सालेभट्टी,ता.भिवापूर,जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला करण्यासाठी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास यापुर्वीच **निशानी क्र. १७** देण्यात आला. पोलिसांनी मला मौजा सालेभट्टी येथे बोलविले होते व माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला मला वाचुन समजुन सांगितला व त्यानंतर मी त्यावर सही केली त्यास यापुर्वीच **निशानी क्र.१८** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला यापुर्वीच **आर्टीकल अ** देण्यात आले.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. फिर्यादी राहूल मेंढुले हे माझ्या चांगल्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी समन्सपत्रामध्ये कोठे हजर राहायचे याबाबत लिहीलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की,घटनास्थळ पंचनामा करण्याकामी मला फिर्यादी राहूल यानेच बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीच्या घरी गेलो त्यावेळी घटनास्थळ पंचनामा लिहून झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी राहूलच्या घरी गेल्यानंतर दुसरा पंच ग्यानीराम ब्राम्हणकर व मी राहूलच्या घरी बसुन घटनास्थळ पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, मी जाण्याच्या पुर्वीच घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर लिहीलेला असल्यामुळे त्यामध्ये काय लिहीले आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला व दुसरा पंच ग्यानीराम यांना घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर वाचुन दाखविला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी व

ग्यानीराम यांनी फिर्यादीच्या सांगण्यावरून घटनास्थळ पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात सांगितलेला मजकूर मी खोटा सांगितला.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२६/०६/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड